# आम्ही येशूच्या आज्ञा पाळतो

### येशूचे आज्ञाधारक अनुयायी होण्यास मुलांना शिकवा

**प्रार्थना:** "हे आमच्या स्वर्गातील पित्या, मुलांनी येशूवर प्रेम करून त्याचे आज्ञापालन करावे याकरीता ह्या अभ्यासाचा उपयोग करून घे. येशूच्या पवित्र नावात मागतो, आमेन."

मुलांचे वयोगट आणि गरजा ह्यांना अनुरूप असे शैक्षणिक कार्यक्रम त्यांच्यासाठी निवडा.

मोठया मुलांने किंवा शिक्षकांनी मत्तय 7:24-29 मधून घर बांधणारा शहाणा व मूर्ख मनुष्य यांचा कथावृत्तांत वाचून दाखववावा.

येशूच्या शिकवणूकीला दोन माणसांनी वेगवेगळा प्रतिसाद दिला तेव्हा काय घडले हे मुलांना काळजीपूर्वक ऐकायला सांगा.

**पुढील प्रश्न विचारा.** प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिले आहे.

कोणते लोक घर बांधणाऱ्यां शहाण्या मनुष्यासारखे आहेत? *(पाहा वचन 24)*

आम्ही येशूच्या शब्दांना कसा प्रतिसाद द्यावा? *(पाहा वचन 24, येशूने जे करायला सांगितले ते आम्ही प्रत्यक्षात केले पाहिजे.)*

कोणते लोक घर बांधणाऱ्या मूर्ख मनुष्यासारखे आहेत? *(पाहा वचन 26)*

मूर्ख मनुष्याचे घर का पडले? *(पाहा वचन 27)*

येशूने दिलेले शिक्षण ऐकून लोकसमुदायाला आश्चर्य का वाटले? *(पाहा वचने 28-29 येशूने त्यांना अधिकाराने शिक्षण दिले.)*



**वाळूच्या पायावर घर बांधणारा मनुष्य**

**मत्तय 7:24-29** मधून घर बांधणाऱ्या दोघांच्या कथावृत्तांत्ताचे नाट्यीकरण करा. मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्यांशी चर्चा करून व्यवस्था करा. मुलांकडून नाटिकेची तयारी, सराव तुम्ही करून घेण्यास स्वत:चा वेळ खर्च करा.

मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात:

- **निवेदक.** कथावृत्तांत्ताची सारांश करा आणि मुलांना संवाद पाठ करण्यास साहाय्य करा.
- **येशू**

लहान मुलांनी पुढील भूमिका करण्यात:

- घर बांधणारा शहाणा मनुष्य (दगड किंवा वीटा जवळ ठेवा)
- घर बांधणारा मूर्ख  मनुष्य (खेळातील ठोकळे किंवा वीटा जवळ ठेवा)
- वादळ (अनेक मुले)

**निवेदक:** वचने 24-25 मधून कथावृत्तांत्ताचा पहिला भाग सांगून म्हणा, "येशू काय सांगतो ते ऐका."

**येशू:** मी सांगतो त्याप्रमाणे तुम्ही वागाल तर तुम्ही घर बांधणाऱ्या त्या शहाण्या सूज्ञ माणसासारखे होणार."

**घर बांधणारा शहाणा मनुष्य:** एकमेकांवर वीटा रचून ठेवा आणि म्हणा, "मी ह्या भक्कम खडकावर घर बांधतो मी येशूच्या आज्ञाचे पालन करतो."

**वादळ:** रचून ठेवलेल्या वीटांवर जोराने फुंकर मारा (पण त्या पाडू नका)

**निवेदक:** वचने 25-29 मधून कथावृत्तांत्ताचा दुसरा भाग सांगून म्हणा, "येशू काय म्हणतो ते ऐका."

**येशू:** "मी सांगतो त्या गोष्टी तुम्ही फक्त ऐकल्या तर तुम्ही घर बांधणाऱ्या त्या मूर्ख माणसासारखे होणार"

**घर बांधणारा मूर्ख मनुष्य:** खोलीच्या एका बाजूला जा घर बांधण्याचे ठोकळे एकमेकांवर ठेवून म्हणा, "मी फक्त येशूचे बोलणे ऐकतो. मी वाळूवर घर बांधतो ते बांधायला सोपे आहे."

**वादळ:** ठोकळे ढकला आणि म्हणा, "काय आश्चर्य आहे! लोकांनी आज्ञा पाळाव्यात अशी येशूची अपेक्षा आहे! तर इतर शिक्षकांना वाटते की लोकांनी फक्त ऐकावे."

**निवेदक:** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

मुलांनी हे नाट्यीकारण मोठया माणासांसमोरं सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी मोठया माणसांना विचारावेत.

**मुलांना विचारा:** येशूने आम्हांला काही गोष्टी करावयास सांगितले आहे त्या आज्ञा कोणत्या? (मुलांना उदाहरणे देऊ द्या)



**खडकावर बांधलेले घर**

येशूने म्हटले, "माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल" (योहान 14:15) याविषयी सांगणारे गीत गोष्ट किंवा कविता लिहिण्यास अथवा चित्र काढण्यास मोठया मुलांना सांगा.

खडकावर बांधलेल्या घराचे चित्र काढा मुलांना तसे काढायला सांगा.

- मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.
- मुलांनी हे काढलेले चित्र पुढच्या उपासनेच्या वेळी मोठया माणसांना दाखवून यावरून येशूचे वचन प्रत्यक्ष आचरणात कसे आणायचे ते समजते असे स्पष्ट करा. विश्वासणाऱ्यांनी येशूचे म्हणणे केवळ ऐकू नये तर त्याप्रमाणे आचरण करणे आगत्याचे असते.

**पाठ करा** लूक 11:28

**कविता:** स्तोत्र 18:2,7,15 व 16 यातून प्रत्येकी एक वचन चार मुलांना म्हणायला सांगा. ही वचने त्यांनी मोठया माणसांनाही म्हणून दाखवावीत.

**प्रार्थना:** "प्रिय प्रभू तुझे शब्द ऐकायला आम्हांला आवडतात. ते आचरणात आणण्याची आमची इच्छा आहे. आम्हांला घर बांधणाऱ्या शहाण्या माणसासारखे होऊन आमची जीवने तुझ्यावर आमच्या भक्कम खडकावर उभारायची आहे. कोणतेही वादळ वा संकट कधीही हिरावून न घेणारे सार्वकालिक जीवन तू आम्हांला दिलेस याबद्दल आम्ही तुझे आभार मानतो."

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net